नवी आशा नवी दिशा
देशदूत
eshdoot.com नाशिक वर्ष ४७ । अंक १३१ । रविवार, दि. १५ जानेवारी २०१७ । पाने १२+१६ किंमत ₹

# उपेक्षितांसाठी १५ हजार नाशिककरांची 'रन'

■ सातपूर । दि. १४ प्रतिनिधी



मकरसंक्रांतीचा दिवस, गुलाबी थंडीत पिस्ता रंगाचा 'नाशिक रन २०१७' शीर्षकाचा आकर्षक टी-शर्ट परिधान करून लहानग्यांसह तरुण, महिला व ज्येष्ठांनी घेतलेल्या सहभागाने प्रात: काली नाशिककरांनी महात्मानगर क्रीडांगण फुलून गेले होते. समाजातील वंचित घटकांना मदतीचा हात देण्यासाठी नाशिक रन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने आयोजित १५ व्या 'नाशिक रन' उपक्रमामध्ये सुमारे १५ हजाराहून अधिक अबालवृद्धांनी सहभाग घेऊन सामाजिक बांधिलकीप्रती आपली वचनबद्धता अधोरेखित केली.

गरजू व्यक्तींना मदतीचा हात देण्याच्या उदात्त हेतूने २००३ मध्ये बॉश व इप्कॉससह काही समविचारी कंपन्यांनी एकत्र येऊन 'नाशिक रन'ची संकल्पना मांडली आणि बघता बघता नाशिक रन चॅरिटेबल ट्रस्टने समाज सेवापूर्तीची १४ वर्षे पूर्ण करत आज १५ व्या 'नाशिक रन'चे आयोजन केले. या कार्यक्रमाचा शुभारंभ कविता राऊत व मोनिका आथरे यांच्या हस्ते क्रीडाज्योत प्रज्वलित करून तसेच महापौर अशोक मुर्तडक यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. (पान ४ वर)

## उपेक्षितांसाठी १५ हजार नाशिककरांची 'रन'

यावेळी विविध संस्थांच्या माध्यमातून १७ पूरस्कार ठेवण्यात आले होते. लकी डॉच्या माध्यमातून उपस्थितांपैकी विजेत्यांना भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. पुढील वर्षात उपक्रमाच्या आयोजनाची जबाबदारी इप्कॉसचे हरिशंकर बॅनर्जी यांच्या कडून बॉशचे एच.वी.थॅन्टेश यांच्या सपूर्द करण्यात आली.

SUNDAY, JANUARY 15, 2017 PAGES 8, ₹ 3

DESHDOOT Times
....watching north maharashtra

# Over 15000 participate in Nashik Run

PICS: MANOJ UNHAVANE





**NASHIK**

All for a noble cause... with the desire to serve the underprivileged and spread the message of humanity and healthy living among the Nashikites, over 15000 participants, who had gathered at 7.30 am in the morning of Makar Sankranti festivities at Mahatma Nagar Ground here yesterday, wearing Pista-colour T-shirts showed their solidarity towards a common social cause by participating in the 15th edition of Nashik Run.

The Nashik Run event, organised by Nashik Run Charitable Trust has come a long way since its inception in 2003.

It was indeed a proud moment for Nashikites as Mayor Ashok Murtadak, Nashik Run founder trustee and Bosch India managing director Soumitra Bhattacharya, Bosch India executive director Andress Wolf, Nashik Run founder trustee and TDK-EPCOS managing director N Balakrishnan, city police commissioner Dr Ravinder Singal, former trustee of Nashik Run S M Hegde, finance controller of Bosch India Diesel System Shrinivas Kumar, Nashik Run president and TDK-EPCOS executive chairman H S Banerjee, Nashik Run vice president and Bosch Nashik (VP, commerce) H B Thontesh, Nashik Run VP and Bosch Nashik (VP, technical) Avinash Chintawar, Bosch Nashik (GM, HRD) Mukund Bhat, Nashik Run secretary and TDK-EPCOS senior HR manager Anil Daithankar, Nashik Run treasurer Rajaram Kasar, trustee Sudhir Yeolekar apart from corporator Shivaji Gangurde, Chhaya Thakare and Ranjan Thakare graced the occasion by sharing the dais.

The event started with unfurling of the National Flag by Mayor Ashok Murtadak. The torch bearer of Nashik Run 2017 was none other than Ms. Kavita Raut, the international marathon runner from Nashik along with Sanjeevani Jadhav and sports advisor Vijendra Singh. The enthusiasm of all the participants was heightened as the flame was lit and Nashik Run 2017 was declared open by Nashik Run president H S Banerjee after releasing balloons in the air.

Warming up on the presentation by the artists of Atul Narang Dance Institute, people from all walks of life participated in the Run. The Run started step by step with specially abled children first, later boys/girls and finally the adults. The children proceeded via Titan showroom, Parijat Nagar and Six Sigma Hospital to return back to the Mahatma Nagar Ground while, the adults proceeded via Mahatma Nagar, Parijat Nagar, Bhonsala school, Jehan Circle and Swami Samarth Circle before concluding their Run at the Mahatma Nagar Ground.

Apart from the main event of the run, the people also enjoyed the Lucky draw event organised by a few of the sponsors wherein lucky participants won prizes. At the end, reins of the Nashik Run event was handed over to H B Thontesh, VP, Bosch Ltd from Nashik Run president H S Banerjee and TDK-EPCOS.



महात्मानगर : नाशिक रन चॅरिटेबल ट्रस्टतर्फे शनिवारी घेण्यात आलेल्या नाशिक रनमध्ये सहभागी झालेले नाशिककर.

# बोचऱ्या थंडीतही सुदृढ आरोग्याचा संदेश

## 'नाशिक रन'ला आबालवृद्धांसह परदेशी पाहुण्यांचा प्रतिसाद

सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. १४ : भल्या सकाळीच कडाक्याच्या बोचऱ्या थंडीत अन् कोवळी सूर्यकिरणे अंगावर घेत चिमुकले, आबालवृद्ध, परदेशी पाहुण्यांसह दिव्यांगांनी आज 'नाशिक रन'मध्ये हजेरी लावत तंदुरुस्त व सुदृढ आरोग्याचा संदेश दिला. समाजातील गरजू व वंचित घटकांच्या मदतीसाठी एकत्र येत हे सारेच धावले. या वेळी झुम्बा नृत्यावर नाशिककरांची पावले

पान ४ वर »




महात्मानगर : नाशिक रन चॅरिटेबल ट्रस्टतर्फे शनिवारी झालेल्या नाशिक रनप्रसंगी सादर करण्यात आलेले झुम्बा नृत्य.



बोचऱ्या थंडीतही सुदृढ आरोग्याचा संदेश

» पान १ वरून

थिरकल्यानंतर नाशिक ढोल-ताशाच्या गजरची झलकही पाहायला मिळाली.

नाशिक रनचे यंदा १५ वे वर्ष होते. हिरव्या रंगाचे टी-शर्ट परिधान केलेल्या नाशिककरांनी सर्वांचेच लक्ष वेधले. या रनसाठी पहाटेपासूनच मैदानावर हौशींनी गर्दी केली. बॉश कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक सौमित्र भट्टाचार्य यांनी उपक्रमाद्वारे गेल्या वर्षी ८५ लाखांचा निधी गोळा झाल्याचे सांगितले. सकाळी आठला आंतरराष्ट्रीय धावपटू कविता राऊत, मोनिका आथरे या धावपटूंनी क्रीडाज्योत प्रज्वलित करत उद्घाटन केले.


या वेळी महापौर अशोक मुतर्डक यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. सुरवातीला दिव्यांगांपासून 'नाशिक रन' सुरू झाले. त्यानंतर लहान मुले, प्रौढ नागरिकांनंतर युवक धावले. या वेळी परदेशी पाहुण्यांनी आपला सहभाग नोंदवत या सामाजिक कार्यात खारीचा वाटा उचलला. या रनच्या उद्घाटनप्रसंगी महापौर अशोक मुर्तडक, पोलिस आयुक्त रवींद्र सिंगल, नाशिक रनचे अध्यक्ष एच. एस. बॅनर्जी, सौमित्र भट्टाचार्य, उपाध्यक्ष एच. बी. थोंटेश, अनिल दैठणकर, अविनाश चिंतावर, पोलिस उपायुक्त विजय पाटील, लक्ष्मीकांत पाटील, आरती पाटील, ताई वामणे, प्रशिक्षक विजेंदरसिंग आदींनी सहभागी होत तंदुरुस्तीचे आवाहन केले. या वेळी मान्यवरांच्या हस्ते कविता राऊत, मोनिका अत्रे व संजीवनी जाधवची आई भारती जाधव यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविले. शिल्पा भेंडे आणि अतुल नारंग यांनी सूत्रसंचालन केले.

> **आगामी स्पर्धांमध्ये चांगल्या कामगिरीचे प्रदर्शन करत जगाच्या नकाशावर नाशिकचे नाव उंचावणार आहे.**
> **- कविता राऊत**

> **नाशिकमध्ये धावपटूंमध्ये कमालीची क्षमता आहे. २०२० मध्ये होणाऱ्या ऑलिंपिक स्पर्धेत नाशिकमधील दहा धावपटू पात्र ठरतील आणि तेच खेळाडू पहिले सुवर्णपदक जिंकतील.**
> **- विजेंदरसिंग, प्रशिक्षक**

# 'नाशिक रन'मध्ये १५ हजार जणांचा सहभाग

**खास प्रतिनिधी, नाशिक**



**समाजातील वंचित** घटकांना मदतीचा हात देण्यासाठी नाशिक रन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने शनिवारी आयोजित नाशिक रनमध्ये कडाक्याच्या थंडीत १५ हजारांहून अधिक आबालवृद्धांनी सहभागी होत सामाजिक बांधीलकी अधोरेखित केली.

परंतु, गतवर्षीच्या तुलनेत सहभागी होणाऱ्यांची संख्या काहीशी कमी झाली. पण, सहभागी झालेल्यांमध्ये चांगलाच उत्साह होता. टीडीएस इप्कॉस कारखान्यातील कर्मचाऱ्यांनी आपल्या वेतनातील सुमारे चार लाखांची रक्कम देणगी स्वरूपात ट्रस्टला दिली.

सकाळच्या गारव्यात पिस्ता रंगाचा टी शर्ट परिधान केलेले बालके, युवा वर्ग, महिला व जेष्ठांनी महात्मा नगरचे मैदान फुलले.

नाशिकस्थित काही समविचारी उद्योगांनी एकत्र येत सामाजिक बांधीलकी जपण्याच्या हेतूने नाशिक रन चॅरिटेबल ट्रस्टची स्थापना केली. २००३ पासून सुरू झालेल्या या उपक्रमाचे हे १५ वे वर्ष आहे. यावेळी महापौर अशोक मुर्तडक, नाशिक रनचे विश्वस्त व बॉश इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक सौमित्र भट्टाचार्य, बॉश इंडियाचे कार्यकारी संचालक अॅड्रीस वोल्फ, इप्कॉसचे व्यवस्थापकीय संचालक एन बालाकृष्णन, पोलीस आयुक्त रवींद्र सिंघल आदी उपस्थित होते. ध्वजारोहण झाल्यानंतर आंतरराष्ट्रीय कविता राऊत व क्रीडा मार्गदर्शक वीजेंद्र सिंग यांच्या उपस्थितीत ज्योत प्रज्वलित करण्यात आली. क्रीडापटूंचा सत्कार करण्यात आला. फुगे हवेत सोडून नाशिक रनचा शुभारंभ झाला. यावेळी कलाकारांनी नृत्य सादरीकरण केले.

सुरुवातीला विशेष मुले, नंतर शालेय विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक यांना टप्प्याटप्प्याने सोडण्यात आले. रनचा मार्ग छोट्यांसाठी अडीच किलोमीटर तर मोठ्यांसाठी साडेचार किलोमीटर होता. त्याचा समारोप महात्मानगरच्या मैदानावर करण्यात आला. रनमध्ये सहभाग नोंदविणाऱ्यांसाठी खास सोडत काढण्यात आली. त्यातील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसांचे वितरण करण्यात आले.

सचिव अनिल दैठणकर यांनी आभार मानले. रनच्या यशस्वितेसाठी टीडीके इप्कॉस आणि बॉश कारखान्याच्या ३०० हून अधिक स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

लोकसत्ता Sun, 15 January 2017
epaper.loksatta.com/c/17119182

## दैनंदिनी

### उपक्रम / शिबिर

### सामाजिक / सांस्कृतिक

### धार्मिक



सामाजिक बांधिलकी | नाशिक रन चॅरिटेबल ट्रस्टच्या उपक्रमाला उदंड प्रतिसाद

# १० हजार नाशिककरांचा रन; वंचितांसाठी ठरले योगदान

प्रतिनिधी । नाशिक



### या मान्यवरांचा सहभाग

### टीम टीडीकेने दिली चार लाखांची देणगी

### गरजूंना मदतीचा हेतू

# एकाच दिवशी वेगवेगळ्या परीक्षा; परीक्षार्थींची अडचण

प्रतिनिधी । नाशिक

### परीक्षा पुढे ढकलावी

कामगार विभागाच्या पदासाठी जानेवारी २०१५ मध्ये जाहिरात निघाली होती, तर, अर्थ व सांख्यिकी विभागाच्या पदासाठी डिसेंबर २०१५ मध्ये जाहिरात निघाली होती. या दोन्हीही परीक्षा एकाच दिवशी आल्याने परीक्षार्थींची मोठी कुचंबणा आहे. त्यामुळे एक परीक्षा पुढे ढकलण्यात यावी.

# जिल्हा रुग्णालयाने साजरी केली आगळीवेगळी संक्रांत

रुग्णांना तिळगुळाचे वाटप अन् स्वच्छतेचेही आवाहन

प्रतिनिधी । नाशिक

## HighLights

### पोलीस क्रीडा स्पर्धेत जयश्री पेखळेला सुवर्ण

नाशिक – ओढा येथील रहिवासी जयश्री पेखळे हिने २९ व्या राज्यस्तरीय पोलीस क्रीडा स्पर्धेत बॉक्सिंगमध्ये सुवर्णपदक मिळविले. याबद्दल तिचा ओढा ग्रा.पं.तर्फे नुकताच सत्कार करण्यात आला. जयश्री ही ओढा येथील रहिवासी असून बृहन्मुंबई पोलीस विभागाचे प्रतिनिधीत्व करते. नुकत्याच झालेल्या स्पर्धेत अंतिम सामन्यात अमरावतीच्या रूपाली टिकरे हिचा पराभव करत जयश्रीने सुवर्णपदक पटकावले. पटणा येथील राष्ट्रीय स्पर्धेत ६९ किलोगटात ती महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करणार आहे. जयश्रीच्या यशाबद्दल सरपंच सुमन निकम, उपसरपंच विष्णू पेखळे, सहकारी सेवासंस्थेचे अध्यक्ष काशीनाथ पेखळे, एन.डी.सी.सी. बँक विभागीय अधिकारी प्रकाश राजोळे, मधुकर पेखळे, साहेबराव पेखळे, रंगनाथ पेखळे, अरुण पेखळे, एकनाथ पेखळे, सुरेश सहाणे, विजय सहाणे, विलास पेखळे, विलास कांडेकर, भिकाजी कांडेकर आदींनी तिचे अभिनंदन केले.

### मारवाडी गुजराती मंचतर्फे मंगळवारी आरोग्य शिबिर

नाशिक – अखिल भारतीय मारवाडी गुजराती मंच या संस्थेच्या वतीने सहकार महर्षी हुकूमचंद बागमार यांच्या जयंतीदिनी मंगळवारी (दि. १७) साईलाईफ मल्टीकेअर, मंडई, रविवार कारंजा या ठिकाणी मोफत आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले आहे. परिसरातील सर्व नागरिकांनी शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन अखिल भारतीय मारवाडी गुजराती मंच व पदाधिकाऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### इफकोतर्फे उद्या शेतकरी संमेलन

नाशिक– रासायनिक खत उत्पादक सहकारी संस्था इफकोतर्फे सोमवारी (दि. १६) सकाळी ९.३० वाजता स्वामी नारायण मंदिर हॉल, नवीन आडगाव नाका, पंचवटी येथे शेतकरी संमेलन आयोजित करण्यात आले आहे. इफकोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. यू. एस. अवस्थी हे इफको सभासद संस्था व शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत.






नाशिक रनमध्ये सहभागी नाशिककरांना ध्वज दाखवत रनला सुरुवात करताना महापौर अशोक मुर्तडक. समवेत कविता राऊत आणि नाशिक रनचे पदाधिकारी. तर दुसऱ्या छायाचित्रात नाशिक रनमध्ये सहभागी नाशिककर. (सर्व छायाचित्रे : गणेश खिरकाडे)

## समाज उत्थानासाठी समरसून धावले नाशिककर

# नाशिक रनच्या समाजकार्याला नाशिककरांचा 'सॅल्यूट'

**नाशिक** - आदिवासी, कष्टकरी, पीडित आणि गरजूंच्या मदतीला हाकेसरशी धावून येणाऱ्या नाशिक रनच्या खांद्याला खांदा लावून नाशिककरांनी आपला खारीचा वाटा उचलत समाजकार्यात सहभाग नोंदविला. महात्मानगर येथे झालेल्या नाशिक रनच्या दौडमध्ये नाशिककरांनी सकाळच्या बोचऱ्या थंडीतही हजेरी लावत आपले सामाजिक भान जागृत असल्याचे सिद्ध केले आणि नाशिक रनच्या कार्याला प्रोत्साहित केले.

महात्मानगर मैदानापासून निघालेल्या १५ व्या नाशिक रनमध्ये दहा हजारांहून अधिक नाशिककरांनी सहभागी होत समाजातील गरजू व वंचितांच्या मदतीसाठी नाशिकच्या उद्योग क्षेत्रातून होणाऱ्या कामाला सॅल्यूट ठोकला. सकाळी आठ वाजता महात्मानगर मैदानावर दहा हजारांहून अधिक नाशिककर गोळा झाले. यावेळी शहराचे महापौर अशोक मुर्तडक आणि पोलीस आयुक्त रवींद्र सिंघल यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. यावेळी नाशिकची आंतरराष्ट्रीय धावपटू कविता राऊत आणि इतर धावपटूंनी आलेल्या मशालीचे प्रज्वलन करण्यात आले. यावेळी नाशिकचे रनचे अध्यक्ष एच. एस. बॅनर्जी, उपाध्यक्ष एच. बी. थोन्टेश, पोलीस आयुक्त रवींद्र सिंघल, बॉश इंडियो व्यवस्थापकीय संचालक सौमित्र भट्टाचार्य, बालाकृष्णन नटराजन, निमाचे अध्यक्ष बॅनर्जी, अविनाश चिंतावार, महिंद्राचे उपाध्यक्ष हिरामण आहेर, मुकुंद भट, राजाराम कासार, अनिल दैठणकर आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने झाली. त्यानंतर कविता राऊत, महापौर अशोक मुर्तडक आदींच्या हस्ते आकाशात फुगे सोडून रीतसर नाशिक रनचे उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी नाशिक रनचे अध्यक्ष भट्टाचार्य यांच्या हस्ते कविता राऊत आणि बालकृष्णन नटराजन यांच्या हस्ते नाशिकची सुवर्णपदक विजेती संजीवनी जाधव हिच्या आईचा सत्कार करण्यात आला. या दोघींचे प्रशिक्षक विजेंद्रसिंग यांचाही निमाचे अध्यक्ष बॅनर्जी यांनी सत्कार केला. यानंतर अतुल नारंग इन्स्टिट्यूटतर्फे झुम्बा डान्स करण्यात आला.

नाशिक रनची सुरुवात दिव्यांग मुलांच्या दौडने झाली. त्यानंतर छोटी मुले, मुली व त्यानंतर सामान्य नागरिकांनी आपली दौड पूर्ण केली. नाशिक रनचा शुभारंभ महात्मानगर क्रीडांगणापासून रिलायन्स फ्रेश, पारिजातनगर, वर्ल्ड ऑफ टायटन, मधू इंडस्ट्रीज, पुन्हा समर्थनगर, पारिजातनगर, सिक्स सिग्मा हॉस्पिटल, महात्मानगर असा होता. प्रौढांसाठी महात्मानगर, रिलायन्स फ्रेश, पारिजातनगर, वर्ल्ड ऑफ टायटन्स, रॉकेट सर्कल, जेहान सर्कल, स्वामी समर्थ सर्कल, आयसीआयसीआय एटीएम, पुन्हा महात्मानगरकडे असा रनचा मार्ग होता.

### मनोरंजनाची धूम

नाशिक रनच्या निमित्ताने नाशिककरांना महात्मानगर मैदानावर मनोरंजनाचे जणू पॅकेजच मिळाले. नाशिक ढोलच्या माध्यमातून नाशिककरांच्या रक्तात जणू समाजसेवेचे स्फुल्लिंग चेतविले गेले. त्यानंतर अतुल नारंगच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेला झुम्बा डान्सने नाशिककरांचे शरीर धावायला सज्ज झाले. यानंतर विविध उद्योग क्षेत्रातील कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांनी, तर नाशिक रनच्या उपक्रमात मजा आणली. सकाळपासून तीन तास चाललेल्या या कार्यक्रमांत नाशिककरांना आपण एका चांगल्या उपक्रमाला हजेरी लावल्याचा आनंद घेता आला. सहभागी धावकांमधून आयोजकांनी लकी ड्रॉ काढून त्यांचा उत्साह आणखी द्विगुणित केला.

### बच्चे कंपनीचा उत्साह

सकाळच्या गुलाबी नव्हे, तर बोचऱ्या आणि अंगाला काटा आणणाऱ्या थंडीतही अगदी पाच वर्षांपासून ते दहा ते बारा वर्षांपर्यंतच्या मुला-मुलींनी नाशिक रनला हजेरी लावत भावी पिढीतही सामाजिक उत्तरदायित्व असल्याची चुणूक दिसली. खास बच्चे कंपनीसाठी असलेल्या रनमध्ये हजारो मुलांच्या सहभागाने नाशिककरांमध्ये वेगळाच उत्साह दुणावला. लहान मुलांचे धावण्याचे अंतर महात्मानगर ते जेहान सर्कल एवढेच असले, तरीही त्यांचा उत्साह वाखाणण्याजोगा होता. अंगावर नाशिक रनचा टी शर्ट आणि पायात धावण्याची ताकद यामुळे नाशिक रन चॅरिटेबल ट्रस्टचा उद्देश सफल झाल्याचा आनंद आयोजकांच्या चेहऱ्यावर वेळोवेळी दिसत होता.







नाशिक रनची मशाल प्रज्वलित करताना कविता राऊत, मोनिका आथरे, ताई बामणे, एस.एम.काळे, विजेंद्रसिंग आदी. तर दुसऱ्या छायाचित्रात नाशिक रनची मधील लहानग्यांचा धावण्याचा उत्साह आणि तिसऱ्या छायाचित्रात ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी मैदानी स्पर्धेत दोन विक्रमी सुवर्णपदक मिळवणारी नाशिकच्या संजीवनी जाधवच्या आईचा सत्कार करताना बॉशचे बालाकृष्णन नटराजन.

Lokmat – 15/01/2017



'नाशिक रन २०१७' मध्ये सहभागी नाशिककर.



रनमध्ये धावताना लहान मुले.

नाशिक रन : सुजलाम् सुफलाम्चा संदेश; विविध वयोगटातील नागरिकांचा उपक्रमात सहभाग

# सामाजिक बांधिलकीसाठी धावले नाशिककर

(सर्व छायाचित्रे : नीलेश तांबे)

नाशिक : 'रन नाशिक रन', 'रेडी स्टेडी गो' अशा घोषणांसह पिस्ता रंगाचा टी शर्ट परिधान करून हजारो नाशिककर समाजसेवेच्या हेतूने शनिवारी (दि.१४) 'नाशिक रन' या उपक्रमात धावले. सकाळच्या गुलाबी थंडीत आणि उगवत्या तांबूस रंगाच्या सूर्योदयाच्या साक्षीने विविध वयोगटातील नाशिककरांनी या उपक्रमात मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

त्र्यंबकरोड येथील महात्मानगर मैदानापासून शनिवारी सकाळी साडेसात वाजता या रनला महापौर अशोक मुर्तडक यांच्या हस्ते झेंडा दाखवून मोठ्या उत्साहात सुरुवात करण्यात आली. लहान मुलांपासून आबालवृद्धांपर्यंत विविध वयोगटातून नागरिक या रनमध्ये सहभागी झाले होते. शहरातील विविध शाळा तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी, औद्योगिक क्षेत्रातील अधिकारी आणि कर्मचारी वर्ग, महिला यांच्यासह विशेष विद्यार्थी आणि नागरिकांनी या रनमध्ये सहभाग नोंदवला होता.

महात्मानगर मैदानापासून सुरु झालेल्या या रनमध्ये सर्वसामान्यांसाठी ४.५ कि.मी., लहान मुलांसाठी २.५ कि.मी. आणि विशेष नागरिकांसाठीचा मार्ग असे तीन प्रकारचे मार्ग निश्चित करण्यात आले होते. महात्मानगर मैदान, पारिजातनगर, भोसला महाविद्यालय, जेहान सर्कल, स्वामी समर्थ मंदिर चौक, कृषीनगर, समर्थनगर आणि पारिजातनगर मार्गे पुन्हा महात्मानगर मैदान येथे या रनचा समारोप करण्यात आला. यावर्षी घेण्यात आलेल्या नाशिक रनचे हे पंधरावे वर्ष होते. कुठल्याही प्रकारची स्पर्धा नसलेल्या या रनमध्ये केवळ सामाजिक दायित्व या हेतूने विक्री झालेल्या टी शर्टमधून संकलित झालेला निधी सामाजिक कार्यासाठी वापरण्यात येणार असल्याचे नाशिकरनच्या वतीने सांगण्यात आले. रन पूर्ण झाल्यानंतर या उपक्रमात सहभागी झालेल्या नागरिकांनी जमा केलेल्या कूपनची सोडत काढण्यात आली आणि सोडतीतून १४ भाग्यवंत नागरिकांना आकर्षक पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच नाशिक रनचे हस्तांतरण नाशिक रनचे अध्यक्ष एच. एस. बॅनर्जी यांनी टीडीके इपकॉसकडून बॉशच्या एच. बी. थॉन्टेश यांच्याकडे सुपूर्द केले.

आंतरराष्ट्रीय धावपटू तसेच ऑलिम्पिक स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करणारी धावपटू कविता राऊत, मोनिका आथरे, ताई बामणे, प्रशिक्षक विजेंदर सिंग यांच्या हस्ते क्रीडाज्योत प्रज्वलित करून या रनचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर महापौर अशोक मुर्तडक, पोलीस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल, नाशिक रनचे संस्थापकीय विश्वस्त आणि बॉश इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक सौमित्र भट्टाचार्य, बॉश इंडियाचे कार्यकारी संचालक ॲण्ड्रेस वोल्फ, नाशिक रनचे संस्थापकीय विश्वस्त आणि टीडीके इपकॉसचे व्यवस्थापकीय संचालक एन. बालाकृष्णन, नाशिक रनचे माजी विश्वस्त एस. एम. हेगडे, बॉश इंडिया डिझेल सिस्टमचे श्रीनिवास कु मार, नाशिक रनचे अध्यक्ष आणि टीडीके इपकॉसचे कार्यकारी अध्यक्ष एच. एस. बॅनर्जी, नाशिक रनचे उपाध्यक्ष आणि बॉश नाशिकचे एच. बी. थॉन्टेश, नाशिक रनचे उपाध्यक्ष आणि बॉश नाशिकचे उपाध्यक्ष अविनाश चिंतावर, बॉशचे मनुष्यबळ महाव्यवस्थापक मुकुंद भट, नाशिक रनचे सचिव आणि टीडीके इप्कॉसचे वरिष्ठ मनुष्यबळ व्यवस्थापक अनिल दैठणकर, नाशिक रनचे खजिनदार राजाराम कासार, विश्वस्त सुधीर येवलेकर आदि उपस्थित होते. सूत्रसंचालन अतुल नारंग आणि शिल्पा भेंडे यांनी केले. (प्रतिनिधी)



पंधराव्या नाशिक रनचे क्रीडाज्योत प्रज्वलित करून उदघाटन करताना कविता राऊत, मोनिका आथरे, ताई बामणे, विजेंदर सिंग आदि.



नाशिक रनमध्ये विशेष नागरिकांनीदेखील उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला.

## धावपटू, प्रशिक्षक सन्मानित

◆ शनिवारी आयोजित करण्यात आलेल्या नाशिक रन उपक्रमात आंतरराष्ट्रीय धावपटू कविता राऊत, संजीवनी जाधव हिची आई आणि प्रशिक्षक वीजेंदर सिंग यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी सौमित्र भट्टाचार्य यांच्या हस्ते कविता राऊत, नाशिक रनचे उपाध्यक्ष एच. एस. बॅनर्जी यांच्या हस्ते संजीवनी जाधव हिच्या आईचा तर उपाध्यक्ष एच.बी. थॉन्टेश यांच्या हस्ते प्रशिक्षक वीजेंदर सिंग यांना सन्मानित करण्यात आले.

## सेल्फी ऑन सोशल साईट्स

◆ रनसाठी एकत्र झालेल्या नाशिककरांमध्ये सेल्फी काढण्याची जणू स्पर्धाच सुरु होती की काय, असा सवाल प्रत्येकाला पडला नसेल तरच नवल. नाशिक रनच्या निमित्ताने भेटलेले मित्र-मैत्रिणी तसेच धावतानाचे व संगीतावर थिरकताना काढलेले सेल्फी सोशल मीडिया साईट्सवर अपलोड करण्यात येत होते.

## 'सुजलाम् सुफलाम्' चा संदेश

◆ दरवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या नाशिक रन चा उद्देश सामाजिक कार्यात हातभार लावण्याचा असला तरी या रन मध्ये परिधान करण्यात येणाऱ्या टी - शर्ट या रनचे प्रमुख वैशिष्ट्य असते. दरवर्षी या रनसाठी निवडण्यात आलेल्या टी शर्ट चे वेगळेपण नाशिक रन नेहमी अधोरेखित करत आला आहे. यावर्षी या रन साठी पिस्ता रंग निवडण्यात आला होता. गेल्यावर्षी पर्जन्यमान चांगले झाल्याने पाणी तसेच शेत पिकांची मुबलकता असल्याने अशी स्थिती कायम रहावी यासाठी यावर्षी नाशिक रन साठी पिस्ता रंग निवडण्यात आल्याचे सुधीर मुतालिक यांनी सांगितले.



## परदेशी पाहुणेही धावले

◆ सामाजिक बांधिलकी जपण्याच्या दृष्टीने दरवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या नाशिक रन स्पर्धेत विदेशी पाहुण्यांचाही उत्स्फूर्त सहभाग बघायला मिळतो. यावर्षीही नाशिक रनमध्ये परदेशी पाहुण्यांनी आपली उपस्थिती लावली.

## वॉर्म अपसाठी झुंबा डान्स आणि क्लॅपिंग

◆ गुलाबी थंडीत प्रत्यक्षात रनला सुरुवात होण्याआधी मानसी नारंग यांनी सादर केलेल्या झुंबा डान्सवर ठेका धरुन उपस्थित रनर्सनी वॉर्म अप केले. यावेळी सादर करण्यात आलेल्या वेगवेगळ्या मेलेडीज् गाण्यांवर आणि करावके (साऊंड ट्रॅक) वर ठेका धरुन आबालवृध्दांनी उत्स्फूर्त झुंबा नृत्य सादर केले. यामध्ये युवावर्गाचा उत्साह विशेष लक्ष वेधून घेत होता. तसेच यावेळी अतुल नारंग यांनी खास 'नाशिक रन क्लॅप' या तालबध्द टाळ्या उपस्थिताकडून वाजवून घेत रनपूर्वी घेण्यात आलेल्या कार्यक्रमात रंगत आणली. मात्र यामुळे धावणाऱ्यांच्या अंगात ऊर्जा तयार होऊन थंडी पळाल्याचे प्रत्येक जण बोलून दाखवित होते.